# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:10.01.2026** **वार:शनिवार**

1. **तांत्रिकदृष्ट्या प्रगत लष्कर असणं, हीच आधुनिक काळात विजयाची गुरुकिल्ली ठरेल- सरसेनाध्यक्ष जनरल अनिल चौहान यांचं प्रतिपादन**
2. **संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा पहिला टप्पा येत्या 28 जानेवारीपासून**
3. **राज्यात महानगरपालिका निवडणुकीचा प्रचार शिगेला; राजकीय पक्षांकडून डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर**
4. **दशावतार सह 4 चित्रपट ऑस्करच्या सर्वसाधारण श्रेणीसाठी पात्र, कांतारासह 5 चित्रपट उत्कृष्ट चित्रपटांच्या यादीत आणि**
5. **राज्यात यंदाच्या रब्बी हंगामात सरासरीपेक्षा जास्त क्षेत्रावर पेरण्या**

**जनरल अनिल चौहान**

आधुनिक युद्धाच्या सिद्धांतानुसार लष्करी नेतृत्वानं बौद्धिकदृष्ट्या तयार राहून स्वतःला बदलणं गरजेचं आहे, असं प्रतिपादन सरसेनाध्यक्ष जनरल अनिल चौहान यांनी काल पुण्यात केलं. गोखले इन्स्टिट्यूटमध्ये आयोजित पुणे पब्लिक पॉलिसी फेस्टिवलमध्ये प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. संरक्षण क्षेत्रातील तंत्रज्ञानाची भूमिका या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केलं. भारतीय सशस्त्र दलं आता 'नेट-सेंट्रिक' कडून 'डेटा-सेंट्रिक' युद्धपद्धतीकडं वळत आहेत. यामध्ये माहितीचं संकलन आणि विश्लेषण करण्यासाठी एआय ही एक महत्त्वाची पायाभूत सुविधा ठरेल, असं जनरल चौहान म्हणाले. आधुनिक काळात तांत्रिकदृष्ट्या प्रगत असणं हीच विजयाची गुरुकिल्ली ठरेल, म्हणूनच स्वदेशी ड्रोन तंत्रज्ञान आणि 'काउंटर-ड्रोन' ग्रीड्स विकसित करण्यावर भर देणं गरजचं आहे, असं सरसेनाध्यक्ष जनरल चौहान यांनी सांगितलं.

**अर्थसंकल्पीय अधिवेशन**

संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन येत्या 28 जानेवारी ते 2 एप्रिल या कालावधीत होणार आहे. संसदीय कामकाज मंत्री किरेन रीजीजू यांनी काल समाजमाध्यमावर ही माहिती दिली. अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा पहिला टप्पा येत्या 28 जानेवारी ते 13 फेब्रुवारी या कालावधीत; तर दुसरा टप्पा 9 मार्च ते 2 एप्रिल या कालावधीत होणार आहे.

**रक्षा खडसे**

यंदाच्या विकसित भारत युवा नायक संवाद उपक्रमाच्या माध्यमातून, 2047 च्या विकसित भारताच्या संकल्पनांबाबत विचार मांडण्याची संधी युवकांना मिळेल, असा विश्वास केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी व्यक्त केला आहे. यंदा या उपक्रमासाठी प्रथमच विविध देशांतील तरुण नेत्यांना आमंत्रित केलं असून, यात सहभाग घेण्यासाठी माय भारत पोर्टलवर नोंदणी करण्याचं आवाहन त्यांनी युवा पिढीला केलं. या विषयावर आकाशवाणीला काल दिलेल्या मुलाखतीत बोलताना त्या म्हणाल्या......

**विकसित भारत यंग लीडर डायलॉग्स के इस साल का प्रोग्राम शुरू हुआ है और इसका शुरू करने का मकसद यही है कि बारह जनवरी को विवेकानंद जी की जयंती आती है| और उस अवसर पर पूरे देश में फेस्टिवल के प्रोग्राम भी किए जाते हैं| सरकार के माध्यम से तो पिछले साल से आदरणीय प्रधानमंत्री जी के सोच से और**

**आदरणीय हमारे मंत्री मनसुख मांडवीय जी के और हमें हमारे सभी मंत्रालय के माध्यम से एक अच्छा आइडिया आगे आया कि, हम पूरे देश में से हम बच्चों को यहाँ पर बुलाएं और उनके विचार हम सुने और विकसित भारत के साथ उसे जोड़ा जाए | क्योंकि आदरणीय प्रधानमंत्री जी का हमेशा से कहना रहता है, कि युवा शक्ति आने वाले दिनों में इस देश को आगे बढ़ाने के लिए काफी महत्वपूर्ण भूमिका निभाने वाले हैं | विकसित भारत यूथ लीडर डॉलर्स प्रोग्राम का यही एक मकसद है, कि इस प्रोग्राम के साथ हम देश के अलग-अलग राज्यों से अलग-अलग जिला में से आए हुए सभी डिस्ट्रिक्ट से आए हुए सभी यूथ को एक साथ लाए एक प्लेटफॉर्म पे लाए, कि जिसके माध्यम से उनके विचार प्लेटफॉर्म के माध्यम से आगे बढ़ सकते हैं |**

**निवडणुक प्रचार**

राज्यातल्या महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचाराला आता रंग चढत आहे. विविध पक्षांचे प्रमुख नेते झंझावाती प्रचार दौरे करत आहेत. प्रमुख नेते आणि उमेदवारांचा जनतेशी थेट संवाद, जाहीर मुलाखती, रोड शो या माध्यमातूनही जोरदार प्रचार सुरू आहे. पारंपरिक पद्धतींसह निवडणूक प्रचारात आता कृत्रिम बुद्धिमत्तेचाही समावेश झाला आहे. उमेदवार तसंच सर्व पक्षांचे नेते मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी डिजिटलं उपकरणं, तंत्रज्ञानासह विविध माध्यमांचा उपयोग करत आहेत.

**प्रचारसभा**

मुख्यमंत्री आणि भाजपा नेते देवेंद्र फडणवीस यांनी काल नालासोपारा इथं जाहीर सभेला संबोधित केलं. येत्या काळात वसई विरार चौथी मुंबई करण्याचं आमचं स्वप्न आहे, असं फडणवीस यावेळी म्हणाले. शिवसेना नेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल पुण्यात विविध ठिकाणी जाहीर सभा घेतल्या.

राजकारणात विचारधारेप्रती प्रतिबद्धतेचं महत्व घटत असून हे चिंताजनक असल्याचं राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी एका वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत सांगितलं. पवार यांची काल लातूर आणि मिरज इथं प्रचार सभा झाली. भाजपचे ज्येष्ठ नेते आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी लातूरमध्ये पत्रकारांशी संवाद साधताना ठाकरे बंधूंवर निशाणा साधत, मुंबईच्या विकासाबाबत प्रश्न उपस्थित केले. तर भाजपा नेत्या आणि मंत्री पंकजा मुंडे यांनी काल पुण्यात रहाटणी इथं जाहीर सभा घेतली.

सत्ताधारी पक्ष विरोधकांची कोंडी करत आहे अशी टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली. महानगरपालिका निवडणुका या पाणी, स्वच्छता, रस्ते, आरोग्य आणि शिक्षण यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर व्हायला हव्यात, मात्र भाजपा–महायुती या मुद्द्यांवर बोलत नाही, अशी टीकाही सपकाळ यांनी केली. मुंबई आणि ठाण्यात मनसेची तयारी पूर्ण झाली असून योग्य पद्धतीनं काम सुरू आहे, असं मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी एका वृत्तवाहिनीशी बोलताना सांगितलं.

**ऑस्कर**

कांतारा-द लिजंड चॅप्टर 1, तन्वी द ग्रेट, महावतार नरसिम्हा, टुरिस्ट फॅमिली, आणि सिस्टर मिडनाइट हे 5 भारतीय चित्रपट, ऑस्करच्या उत्कृष्ट चित्रपट श्रेणीसाठी पात्र ठरले आहेत. अकादमी ऑफ मोशन पिक्चरनं काल ही घोषणा केली. याशिवाय दशावतार, महामंत्रा, पेपर फ्लॉवर, पारो हे 4 चित्रपट सर्वसाधारण श्रेणीसाठी पात्र आहेत. एकंदर 317 चित्रपट 98व्या ऑस्कर पुरस्कारांसाठी पात्र ठरले आहेत. त्यातल्या 201 चित्रपटांकडं उत्कृष्ट चित्रपट श्रेणीसाठीची अतिरीक्त पात्रता असल्याचं अकादमीनं जाहीर केलं आहे. या सर्व चित्रपटांमधून ऑस्करसाठी नामांकित झालेल्या चित्रपटांची यादी 22 जानेवारीला जाहीर होईल. याशिवाय भारताकडून आंतरराष्ट्रीय चित्रपट श्रेणीसाठी होमबाऊंड या चित्रपटाचं नामांकन पाठवण्यात आलं आहे.

**क्रिएटर्स कॉर्नर**

माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव आणि राज्यमंत्री डॉक्टर एल. मुरुगन यांच्या हस्ते काल नवी दिल्लीत प्रसार भारतीच्या 'क्रिएटर्स कॉर्नर' या उपक्रमाचं उद्घाटन करण्यात आलं. डिजिटल मंचावर सर्जनशील आशयाला प्रोत्साहन देणं हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असून, या माध्यमातून 1 कोटी तरुणांना सर्जनशील अर्थव्यवस्थेशी जोडण्याचं सरकारचं उद्दिष्ट आहे, असं वैष्णव यांनी सांगितलं. WAVES मुळं भारतात तयार होणाऱ्या आशयातून 5 हजार कोटी रुपयांहून अधिक व्यवसाय निर्माण होत असल्याकडेही त्यांनी लक्ष वेधलं.

**रबी पेरण्या**

राज्यात यंदा रबी हंगामातील सरासरी पेरण्या उद्दिष्टापेक्षा जास्त झाल्या आहेत. ऐकुया अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून...

**राज्यात रब्बी हंगामात मुख्य पीक असलेल्या गहू आणि हरभऱ्याच्या शंभर टक्के पेरण्या पूर्ण झाल्या असून ज्वारीची पेरणी 84 टक्क्यांवर पोहोचली आहे. एकंदर रब्बी हंगामातील पिकांच्या पेरणीनं सरासरी ओलांडली असून 101 टक्के पेरण्या पूर्ण झाल्या आहेत. राज्यात यंदा पाण्याची उपलब्धता चांगली असून यापुढेही हवामानाने अनुकूल साथ दिल्यास रब्बी हंगाम चांगला होण्याचा प्राथमिक अंदाज पुणे कृषी विभागाकडून वर्तविण्यात आला आहे. ज्वारीची पेरणी सरासरी क्षेत्रांहून जास्त होण्याची अपेक्षा होती मात्र तसं झालेलं दिसत नाही. सरासरी सुमारे 15 लाख हेक्टर क्षेत्रात सुमारे साडे बारा लाख हेक्टरवरच ज्वारीचा पेरा पूर्ण झाल्याचं कृषि आयुक्तालयाच्या अहवालात म्हटलं आहे. जनावरांच्या चाऱ्यासाठी ज्वारीच्या कडब्याप्रमाणेच मक्यालाही अधिक मागणी असल्यामुळे शेतकऱ्यांनी ज्वारीबरोबरच मका पिकाच्या पेरणीला प्राधान्य दिल्याचं दिसून येत आहे. मक्याच्या 3 लाख 75 हजार हेक्टर सरासरी क्षेत्रात 5 लाख 40 हजार हेक्टरवर म्हणजे 144 टक्के पेरणी झाली आहे. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी पुण्याहून भूषण राजगुरू यांच्यासह संध्या खान.**

**हवामान**

राज्याच्या काही भागात थंडीचा जोर पुन्हा वाढला आहे. काल अहिल्यानगर इथं सर्वात कमी म्हणजे 7 पूर्णांक 5 दशांश तर पुण्यात 8 पूर्णांक 4 दशांश अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली. येत्या 24 तासात संपूर्ण राज्यात कोरडं हवामान राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.